# नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्था

**डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे सहयोगी प्राध्यापक,राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

.........................................................................................................

**प्रस्तावना** दुस—या महायुध्दानंतर जगामध्ये आशिया आफ्रीका लॅटिन अमेरिका या खंडातील अनेक देश वसाहतवादी जोखडातून मुक्त झाले व एक देश म्हणून जगाच्या नकाशावर त्यांचा उदय झाला. त्याचवेळी दुस—या महायुध्दाच्या विनाशाने यूरोप बेचिराक झाला होता. आणि अमेरिका व रशिया या महासत्ताचा उदय झाला होता. युरोपच्या विकासासाठी व नवोदित राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला साहाय्य करण्यासाठी १९४५ ला ब्रिटन वुड्स संस्थेची स्थापना झाली या संस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय बॅक व आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थाचा समावेश होतो. या संस्था विकसनशिल राष्ट्रांना सहाय्यक ठरण्यापेक्षा पुढील काळात बाधक ठरु लागल्या यामुळेच विकसनशिल राष्ट्रांनी या संस्थाची पूर्नरचना करण्यासाठी व त्यांची स्थापना न्याय संमतेवर व्हावी यासाठी नविन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेची मागणी केली.

**नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था:—**नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था म्हणजे न्याय व समतेवर आधारित आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेची निर्मिती करणे जी विकसित राष्ट्राप्रमाणेच विकसनशील राष्ट्राच्या हिताचे संरक्षण करेल.१९७३ साली विकसनशील देशाची नामसंघटनेची अल्जीर्यस येथे चौथे शिखर संमेलन भरले होते या संमेलनात सर्वप्रथम नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेची मागणी केली या संमेलनातील अलिप्तवादी देशांनी ही मागणी लावून धरली व या संबंधी एक प्रस्ताव आणला व याच अधिवेशनात नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा प्रस्ताव मंजूर झाला या प्रस्तावामध्ये NIEO च्या स्थापनेसाठी क्रियान्वित करण्याचे नियम व तत्व ठरविले गेले.

**नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे तत्व**

१) कच्चा माल व निर्मित माल यांच्या मध्ये जास्त अंतर नसावे.
२) विकसनशील देशांद्वारे उत्पादित केलेल्या मालाच्या निर्यातीला प्रोत्साहन द्यावे.
३) विकसनशील देशांनी विकसीत देशांना तांत्रीक सहाय्य द्यावे.
४) विकसनशील देशांची वित्तीय कर्जाचा भार कमी करण्यास प्रयत्न व्हावा.
५) विकसीत देशांनी आपल्या GDP चा 0.7% भाग विकसनशील देशांना द्यावा.
६) आंतरराष्ट्रीय वित्तिय संस्थामध्ये पुर्नरचना करुन तेथे विकसनशील राष्ट्रांना योग्य स्थान द्यावे.
७) बहुराष्ट्र कंपनीच्या वर नियंत्रण आणले पाहिजे व विकसनशील देशातून गरिबीचे निर्मुलन करावे.

थोडक्यात विकसनशील व विकसीत देश एकमेकांशी निर्भल असून गरिब श्रीमंत भेदभाव नष्ट करुन जगातील सर्व देशांची आर्थिक प्रगती करुन न्याय समता व शोषण रहित जग निर्माण करण्याचे हे नविन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे ध्येय असलेले दिसून येते.नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था स्थापनेचे प्रयत्न व्यवस्था स्थापन करण्यासाठी उत्तर दक्षिण संवाद व दक्षिण— दक्षिण संवाद असे दोन प्रयत्न केलेले दिसतात ते पुढीलप्रमाणे

**१) उत्तर—दक्षिण संवाद:—**उत्तर दक्षिण संवाद म्हणजे विकसनशिील व विकसीत राष्ट्रामधील परस्पर सहकार्य व विचार विनिमय म्हणून या उत्तर — दक्षिण संवादाची सुरवात १९७४ मध्ये यूनो मध्ये नविन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था स्थापण्यासाठी मांडलेल्या प्रस्तावापासून सुरवात झाली. त्यानंतर १९७५ मधील पॅरिस संमेलन १९७७ मधील बॉन्ट आयोग व १९८१ साली भरलेले कानफून संमेलन या विविध संमेलनात विकसीत व विकसनशील देशामध्ये चर्चा घडून आली या चर्चेच्या अंती विकसीत देशांच्या आडमुठीपणाच्या भूमिकेमुळे हे संमेलन अपयशी ठरले यानंतर आंतरराष्ट्रीय व्यापारातील फेरिमध्ये उत्तर—दक्षिण संवादाला चालना मिळाली व जागतीक व्यापारासंबंधी विश्व व्यापार संघटनेची स्थापना करण्याचे ठरवले त्यानुसार १ जानेवारी १९५५ ला WTO ची स्थापना झाली हे WTO म्हणजे उत्तर—दक्षिण संवादाचे प्रमुख व्यासपिठच निर्माण झाले. या व्यासपिठाच्या माध्यमातून अनेक वेळा उत्तर दक्षिणमध्ये वाद झाले. या वादामध्ये विकसनशील देशांनी विकसीत देशांच्या जाचक अटी झुगारुन लावून त्यांनी आपल्या अटी मान्य करण्यासाठी दबाव वाढविला पर्यावरण कृषी सबसिडी या विषयी दोहा संमेलन कानकून हॉगकॉग या परिषदेच्या माध्यमातून विकसनशील राष्ट्राचे विकसीत राष्ट्राबद्दल मतभेद

आहेत. १९९२—९७ व २००२ मध्ये झालेले पृथ्वी संमेलनावेळी उत्तर दक्षिण देशामध्ये पर्यावरणाच्या मुद्दयासंबंधी चर्चा घडून आली. ग्रीन हाऊसचा प्रभाव कमी करण्याचा प्रस्ताव होता. ह्या कराराचा कालावधी २०१२ ला संपत आला असला तरी या प्रस्तावाच्या जागी नवीन प्रस्ताव आणण्यासाठी उत्तर—दक्षिण संवादामध्ये दोहा कोपनहेगन या संमेलनामध्ये चर्चा घडून आली पण अमेरिकेच्या आडमुठेपणामुळे उत्तर—दक्षिण संवादात विसंवाद निर्माण झाला.याशिवाय उत्तर दक्षिण संवादाव्यतिरिक्त नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्था स्थापण्यासाठी अनेक संघटनेचा हातभार लागतो. त्यामध्ये आशियात युरोपियन संघ संमेलन भारत जपान ऑस्टेलिया व अमेरिका चर्तत्व कोन अशा विविध संघटना कार्य करताना दिसून येतात.

**२) दक्षिण—दक्षिण संवाद** दक्षिण—दक्षिण संवादामध्ये विकसनशील राष्ट्रामधील परस्पर सहकार्याचा समावेश होतो. विकसनशील राष्ट्र आपआपसात मतभेद विसरुन एकमेकांशी परस्पर सहकार्य करुन आत्मनिर्भलता बनविणे हे दक्षिण दक्षिण संवादाचे ध्येय आहे यातूनच नविन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था निर्माण होईल.विकसनशील राष्ट्राची दक्षिण दक्षिण संवादाच्या माध्यमातून आपआपसामध्ये मतभेद दूर करुन सहकार्याच्या माध्यमातून स्वत:च्या विकास करणे व आत्मनिर्भल बनने हे दक्षिण दक्षिण संवादाचे हे उद्दिष्टये आहे. दक्षिण—दक्षिण संवादामध्ये संयुक्त राष्ट व्यापार व विकास संमेलनात (१९६४) सर्वप्रथम दक्षिण संवादाची स्थापना केली. यामध्ये प्रामुख्याने अलिप्तवादी चळवळीतून निर्माण झालेली नाम संघटनेचा प्रमुख उद्देश हा दक्षिण—दक्षिण सहकार्यावरच आहे. या नामसंघटनेच्या १९७३ च्या परिषदेमध्ये नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था स्थापन करायचे ध्येय ठेवले होते. व याचीच परिणीती १९७४ च्या यूनोच्या अधिवेशनामध्ये दिसून येते नामच्या १४ व्या हवान येथील शिखर संमेलनात २००६ साली दक्षिण—दक्षिण सहकाऱ्याला मजबूत करण्याचे आवाहन केले गेले नाम संघटनेच्या विविध अधिवेशनांच्या माध्यमातून दक्षिण—दक्षिण सहकार्यामध्ये नाम संघटनेप्रमाणेच विकसनशील देशांची G-19, G-24, G-77 या संघटना स्थापन झाल्या व यांनी दक्षिण—दक्षिण सहकार्याच्या माध्यमातून नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न करत असलेले आपणास दिसून येतात. दक्षिण पूर्व आशियामधील आशियान संघटना हे दक्षिण—दक्षिण संयोगामधील एक आदर्श उदाहरण म्हणता येईल कारण या संघटनेने आपल्या सदस्य देशातबद्दल क्षेत्रिय सहयोगाच्या माध्यमातून आर्थिक विकास साधलेला दिसून येतो. याचप्रमाणे सार्क संघटना ही दिक्षण आशियातील दक्षिण—दक्षिण क्षेत्रीय संयोग निर्माण करण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येते.

दक्षिण—दक्षिण सहकार्याच्या माध्यमातून नविन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी २००३ मध्ये IBSA ही संघटना उदयास येऊन विकसनशील देशांच्यामध्ये आर्थिक सहयोग निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन करताना दिसून येते तसेच सिक्का टिम—९ आफ्रिका संघ—आशियाई संयोग संवाद बिस्मटेक या विविध संघटना दक्षिण—दक्षिण सहकार्य वृध्दीगन करण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येतात. असे असले तरी दक्षिण— दक्षिण सहकार्यामध्ये विकसनशील देशामध्ये एकतेचा अभाव दिसून येतो. शेजारील राष्ट्रामधील सिमावाद अंतर्गत कुरगुडीचे प्रश्न वांशिक वाद इ. विविध कारणामुळे दक्षिण—दक्षिण संवादातील अडथळे आपणाला दिसून येतात.

**नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्था व भारताची भूमिका:—** नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये भारताची भूमिका सुरवातीपासूनच महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते भारत हा नाम संघटनेचा संस्थापक सदस्य असून नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या स्थापनेसाठी उत्तर—दक्षिण व दक्षिण—दक्षिण सहकार्याचे दोन मार्गावर जास्त भर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारताने उत्तर—दक्षिण संवादामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावताना विकसीत देशावर दबाव वाढवण्याचे कार्य केले आहे. १९८१ च्या कानकून संमेलनात भारताने नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था स्थापनेसाठी पाचसूत्री कार्यक्रम प्रस्तृत केला त्याचप्रमाणे WTO २००१ च्या दोहा संमेलनात विकसीत देशाच्या पर्यावरण व श्रममानक नियमांना लागू करण्यास प्रखर विरोध केला.२००६ च्या जिनेव्हा संमेलनात कृषी सबसिडीवरुन भारताने विकसीत देशावर दबाव वाढवला होता. याबरोबरच पृथ्वी संमेलन संयुक्त राष्ट्र जलवायू परिषद बालीपरिषद अशा विविध परिषदेच्या माध्यमातून पर्यावरण विषयक नियमन करुन उत्तर—दक्षिण संवादात सहकार्य करण्याचे धोरण भारताने राबवले.भारताने दक्षिण उत्तर

संवादामध्ये G-8 या विकसीत देशांच्या परिषदेच्या माध्यमातून नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्था स्थापनण्यासाठी दबाव निर्माण करत याचबरोबर युरोपीय संघाच्या शिखर बैठका APEC परिषद G-4 संमेलन G-20 संमेलन अशा विविध परिषदेमध्ये भारताने नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था स्थापण्यासाठी प्रयत्न केलेले दिसून येतात. भारत उत्तर दक्षिण संवादच नाही तर दक्षिण दक्षिण संवादामध्ये आशिया सार्क सिक्का अशा विविध संघटनांच्या माध्यमातून आपली भूमिका मांडून आशियाई, आफ्रिका, व लॅटिन अमेरिकेतील देशांना एकत्र करुन नविन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी प्रयत्न करताना दिसून येतात. भारत हा विकसीत आणि विकसनशील देशामध्ये दुवा साधून जागतिक अर्थव्यवस्था ही न्यायप्रणाली असावी व याचा लाभ विकसीत राष्ट्रांबरोबरच विकसनशील राष्ट्रांना मिळावा यासाठी प्रयत्न करताना दिसून येतात.

**निष्कर्षः—**

नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे जे उत्तर—उत्तर व दक्षिण—दक्षिण संवादाचे मार्ग सांगितलेले आहेत. त्या संवादाच्या मार्गात आपणास बदलत्या जागतिक व्यवस्थेमध्ये अनेक अडचणी असल्याचे दिसून येते.

१) उत्तर—दक्षिण संवादामध्ये विकसनशील राष्ट्राची हट्टवादी भूमिकेमुळे नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था अजून निर्माण होऊ शकली नाही.

२) विकसीत राष्ट्र विकसनशील राष्ट्रांना तंत्रज्ञान हस्तातरण करण्याऐवजी फक्त शोषणयुक्त तंत्रज्ञान हस्तातरण करताना दिसून येतात.

३) विकसीत राष्ट्र विकसनशील राष्ट्राच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर बहुराष्ट्र कंपण्याच्या माध्यमातून कब्जा करण्याचे धोरण दिसून येते.

४) विकसीत राष्ट्रामध्ये भिन्न—भिन्न भाषा— व्यवस्था असणारे देश त्यातून त्यांच्यामध्ये असणारा अविस्वार यामुळे हे देश दक्षिण—दक्षिण संवादाच्या माध्यमातून सहकार्य करताना संकुचित धोरण अवलंबतात

५) विकसीत देशामध्ये शिक्षणाचा अभाव धार्मिक तेढ या कारणामुळे एकमेकांच्या संयोगामध्ये अडथळा निर्माण होतो.

६) विकसीत देश विकसनशील देशांना भिक दिल्यासारखे अनुदान देवून त्यांच्यावर वर्चस्व निर्माण करतात.

७) विकसनशिल राष्ट्रामध्ये आत्मनिर्भरतेचा अभाव असल्यामुळे हे राष्ट्र विकसीत राष्ट्राच्या अमिशाला बळी पडतात यामुळे विकसनशील राष्ट्रांच्या एकतेत फुट निर्माण होते.

वरील अडथळे आपल्याला नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी दिसून येत असले तरी विकसीत व विकसनशील राष्ट्रांनी आपआपसात एकत्र येऊन संवाद व सहकार्याच्या माध्यमातून प्रश्न सोडवले पाहिजेत तरच जागतिक पातळीवर नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था निर्माण होऊ शकेल.

**संदर्भ सूचीः—**

१) प्रा. जॉन्सन बोर्जेस, संयुक्त राष्ट्र व इतर आंतरराष्ट्रीय संबंध, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
२) Joshua S. Goldstein, International Ralations, Pearson Publication.
3) Archna Chaturvedi, International Politics, Commonwealth Publication,
4) Samir Dasgupta & Jan Nederveen Pieterse, Politics & Globalization, SAGE, Publication.
5) Prem Arora, Foreign Policies Of the Major Power, Cosmos Bookhive, Publication.